

Rayat Shikshan Sanstha's


Balwant College, Vita

# News Paper Clippings

# 2018-2019

## Rayat Shikshan Sanstha's
## Balwant College Vita
## News Papers Clippings 2018-2019

### Janpravas Date- 09-04-2019



दै. जनप्रवास - दि. ९।४।२०१९.

दै. जनप्रवास - ९।४।२०१९

# रयत शिक्षण संस्थेच्या उभारणीत लक्ष्मीबाईंचा मोलाचा सहभाग : डॉ. जयवंत इंगळे

**विटा • प्रतिनिधी**

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्या उभारणीसाठी चालवलेल्या कामात लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांनी हिरीरीने सहभाग घेऊन मोलाचे सहकार्य नोंदवले, असे प्रतिपादन डॉ. जयवंत इंगळे यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या बळवंत कॉलेज, विटा याठिकाणी लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉलेजचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. यू. एच्. शहा, उपप्राचार्य नंदिनी साळुंखे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. जयवंत इगळे म्हणाले, लक्ष्मीबाई पाटील या अत्यंत कर्मठ आणि सनातन घरातून आलेल्या होत्या. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या आयुष्यात आल्यानंतर मात्र त्यांनी आपला कर्मठपणा हळूहळू नाकारला आणि कालांतराने कर्मवीरांच्या पुरोगामी विचारांना आणि आचारांना स्वतःला पूर्णपणे वाहून घेतले. त्यामुळे रयत शिक्षण संस्था आज नावारुपाला आली.

कर्मवीरांनी चालवलेल्या वसतिगृहातील मुलांचे संगोपन करण्याचे काम लक्ष्मीबाई करत असत. हे करत असताना प्रसंगी त्यांनी आपल्या जवळील सोनेही खर्ची केले. परंतु वसतिगृहातील मुलांची कोणत्याही प्रकारची आबाळ होऊ दिली नाही. कर्मवीरांच्या विचारांच्या खऱ्याखुऱ्या पाईक म्हणूनच त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य विद्यार्थ्यांसाठी वेचले. त्यामुळे प्रत्येक रयतसेवाच्या आणि विद्यार्थ्यांना मनामध्ये त्यांचे स्थान अढळ आहे.

BALWANT COLLEGE
LIBRARY
VITA

LIBRARIAN
Balwant College
VITA.

## Tarun Bharat Date 11-04-2019

दै. तरुण भारत - दि. ११।४।२०१९

# रयत माऊलीचा त्याग भावी पिढीला समजावा : डॉ. इंगळे

प्रतिनिधी
विटा

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्या उभारणीतून महान कार्य केले. या ऐतिहासिक कामात लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांनी हिरहिरीने सहभाग घेतला. रयत माऊलीच्या त्यागाचे महत्त्व भावी पिढीला समजले पाहिजे, असे प्रतिपादन डॉ. जयवंत इंगळे यांनी केले.

येथील बळवंत महाविद्यालयात लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी डॉ. जयवंत इंगळे बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एल. डी. कदम होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन उपप्राचार्या डॉ. यु. एच. शहा, उपप्राचार्या नंदिनी साळुंखे उपस्थित होत्या.

**बळवंत महाविद्यालयात लक्ष्मीबाई पाटील यांची पुण्यतिथी**

डॉ. जयवंत इगळे म्हणाले, लक्ष्मीबाई या अत्यंत कर्मठ आणि सनातन घरातून आलेल्या होत्या. परंतु कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या आयुष्यात आल्यानंतर मात्र त्यांनी आपला कर्मठपणा हळूहळू नाकारला. कालांतराने कर्मवीरांच्या पुरोगामी विचारांना आणि आचारांना स्वतःला पूर्णपणे वाहून घेतले. त्यामुळेच रयत शिक्षण संस्था आज नावारूपाला आली. कर्मवीरांनी चालवलेल्या वसतिगृहातील मुलांचे संगोपन करण्याचे काम त्या करत असत. हे काम करत असताना प्रसंगी त्यांनी आपल्या जवळील एकशेवीस तोळे सोने खर्ची केले. परंतु वसतिगृहातील मुलांची कोणत्याही प्रकारची आबाळ होऊ दिली नाही. कर्मवीरांच्या विचारांच्या खऱ्याखुऱ्या पाईक म्हणूनच त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य विद्यार्थ्यांसाठी वेचले. त्यामुळे प्रत्येक रयत सेवकाच्या आणि विद्यार्थ्यांच्या मनात त्यांचे स्थान अढळ आहे. रयत शिक्षण संस्थेची वैचारिक बैठक घडविण्यात कर्मवीरांच्या बरोबरच त्यांचीही कृतीशील वर्तणूक महत्त्वपूर्ण ठरली, असेही डॉ. इंगळे यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ. कदम म्हणाले, विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात ज्या महिलांनी महाराष्ट्राची शैक्षणिक जडण–घडण केली, त्यामध्ये लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. कर्मवीर आणि लक्ष्मीबाई यांच्यामुळेच बहुजनांसाठी शिक्षणाचे दरवाजे उघडले. अन्यथा निम्म्यापेक्षा अधिक महाराष्ट्र हा आजही शिक्षणपासून वंचित राहिला असता, असेही प्राचार्य डॉ. कदम म्हणाले.

दै. तरुण भारत - ११।४।१९

BALWANT COLLEGE
LIBRARY
VITA

LIBRARIAN
Balwant College
VITA.

# Janpravas Date-06-03-2019



विटा : बळवंत महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या उज्ज्वला शहा यांना निवेदन देताना शिक्षकेतर कर्मचारी.

## बळवंत महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप

विटा, ता. ५ : सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेस वित्त विभागाची मंजुरी नसल्याने पूर्वलक्षी प्रभावाने देण्यात आलेले फायदे रद्द करण्यात आले आहेत. त्यामुळे महाविद्यालयीन कर्मचाऱ्यावर अन्याय झाला आहे. या योजनेस वित्त विभागाने मंजुरी द्यावी, या मागणीसाठी बळवंत महाविद्यालयाच्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आजपासून बेमुदत संप सुरू केला आहे. त्याचे निवेदन प्रभारी प्राचार्या उज्ज्वला शहा यांना देण्यात आले.

१ एप्रिल २०१० ला सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आले. उच्च व तंत्र शिक्षण विभागाने १५ फेब्रुवारी २०११ ला ही योजना महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जशीच्या तशी लागू केली. परंतु त्यानंतर आठ वर्षांनी या योजनेच्या निर्णयास वित्त विभागाची परवानगी नसल्याने कर्मचाऱ्यांचे फायदे रद्द झाले. त्यामुळे कर्मचाऱ्यात असंतोष निर्माण झाला आहे. असे निवेदनात म्हटले आहे.

BALWANT COLLEGE LIBRARY VITA

दै. सकाळ - दि: ६।३।२०१९

LIBRARIAN
Balwant College
VITA.

## Sakal Date 25-03-2019

दै. सकाळ
दि. २५/३/२०१९

सकाळ

- दि: २५/३/२०१९ -

» दृष्टिक्षेपात



विटा : बळवंत महाविद्यालयात पदवीदान सोहळ्यात मार्गदर्शन करताना डॉ. पी. एस. पाटील. शेजारी जयराम मोरे, माधवराव मोहिते.


### बळवंत महाविद्यालयात १८४ स्नातकांना पदवी प्रदान

विटा : येथील बळवंत महाविद्यालय आणि रामानंदनगर महाविद्यालयांचा संयुक्त पदवीदान सोहळा झाला. शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील प्रमुख पाहुणे होते. डॉ. पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी समाजाला उपयोगी पडणारी संशोधने करावीत, असे आवाहन केले. रयत शिक्षण संस्थेच्या दक्षिण विभागाचे अध्यक्ष माधवराव मोहिते यांनी संस्थेच्या वाटचालीची माहिती दिली. या वेळी १८४ स्नातकांना पदव्या देण्यात आल्या. प्राचार्य एल. डी. कदम, एस. टी. साळुंखे, जयराम मोरे, आर. आर. घार्गे, एम. बी. चव्हाण, सुरेश पाटील, एन. एम. जगताप, व्ही. बी. पाटील, यू. एच. शहा, ए. बी. माळी, संध्या जाधव आदी उपस्थित होते.

BALWANT COLLEGE LIBRARY * VITA *

LIBRARIAN
Balwant College,
VITA.

# Tarun-Bharat Date- 22-02-2019



तरुण भारत
सांगली

दिनांक: 22-2-2019 शुक्रवार

## वैज्ञानिक दृष्टीकोन असलेल्या युवकांची देशाला गरज

प्रतिनिधी
विटा

समाजात विज्ञान, हातचलाखी आणि तंत्रज्ञान वापरून फसवणूक केली जाते. युवकांनी समाजातील अशा प्रकारांना आळा बसेल आणि समाज प्रगतीच्या दिशेने वाटचल करेल, असे काम करावे. वैज्ञानिक दृष्टीकोन असलेल्या युवकांची देशाला गरज आहे, असे प्रतिपादन भास्कर सदाकळे यांनी केले.

येथील बळवंत महाविद्यालयात अंधश्रद्धा निर्मुलन समिती आणि विवेक वाहिनी यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्य अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या तारांगण दर्शन उपक्रमाचे व्यवस्थापक भास्कर सदाकळे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सदाकाळे यांनी विविध प्रयोगाद्वारे व्याख्यान विद्यार्थ्यांसमोर सादर केले. अध्यक्षस्थानी डॉ. एस. एम. शेंडगे होते.


**बळवंत महाविद्यालयात 'अंधश्रद्धा निर्मुलन'तर्फे व्याख्यान**

सदाकळे म्हणाले, परिस्थितीनुसार आपण महासत्ता होण्याच्या दृष्टीने पुढे जाताना युवकांनी वैज्ञानिक दृष्टीकोन जोपासने गरजेचे आहे. समाजात विज्ञान, हातचलाखी आणि तंत्रज्ञान वापरून विविध चमत्कार दाखवुन फसवणूक केली जात आहे. त्यासाठी सध्याच्या युवकांनी आपल्या विद्यार्थी दशेत असताना समाजातील अशा प्रकारांना आळा बसेल आणि समाज प्रगतीच्या दिशेने वाटचल करेल, असे कार्य करावे. ज्या घातक शक्ती अशा प्रकारचे कृत्य करून समाजातील घटकांचे शोषण करत आहेत, त्याविरूद्ध युवकांनी सक्षम उभे राहण्याची गरज असल्याचे सदाकळे म्हणाले.

डॉ. एस. एम. शेंडगे यांनी युवकांनी शारीरिक आणि मानसिक प्रगती करून आपल्या क्षेत्रात देशसेवा करावी, देशसेवा कोणत्याही प्रकारे करता येते. असे मत व्यक्त केले. स्वागत आणि प्रास्ताविक डॉ. ए. एस. सरतापे यांनी केले. प्रभारी प्राचार्या डॉ. उज्वला शहा, डॉ. पी. एस. माने, प्रा. ए. टी. खाडे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

BALWANT COLLEGE
LIBRARY
VITA

# Janpravas Date-22-02-2019



दैनिक

बातम्यांचा राजा

जनप्रवास

दिनांक · 22-2-2019

## वैज्ञानिक दृष्टीकोन असलेल्या युवकांची देशाला गरज : भास्कर सदाकळे

विटा • प्रतिनिधी

वैज्ञानिक दृष्टीकोन असलेल्या युवकांची देशाला गरज आहे असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य अंधश्रध्दा निर्मुलन समितीच्या तारांगण दर्शन उपक्रमाचे राज्य व्यवस्थापक भास्कर सदाकळे यांनी केले. येथील बळवंत महाविद्यालयामध्ये अंधश्रध्दा निर्मुलन व विवेक वाहिनी समितीच्यावतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमामध्ये ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. एस. एम. शेंडगे होते. यावेळी भास्कर सदाकळे यांनी विविध प्रयोगाद्वारे आपले व्याख्यान विद्यार्थ्यांसमोर सादर केले. भास्कर सदाकळे म्हणाले, सद्यस्थितीनुसार आपण महासत्ता होण्याच्या दिशेने जात असताना युवकांनी वैज्ञानिक दृष्टीकोन जोपासणे गरजेचे आहे. समाजामध्ये विज्ञान, हातचलाखी व तंत्रज्ञान वापरुन विविध चमत्कार दाखवून फसवणूक केली जात आहे. सध्याच्या युवकांनी आपल्या शैक्षणिक काळात वैज्ञानिक दृष्टीकोन जोपासून समाजामधील अशा प्रकारांना आळा बसेल व समाज हा प्रगतीच्या दिशेने वाटचाल करेल. ज्या घातक शक्ती अशा प्रकारचे कृत्य करुन समाजातील घटकांचे शोषण करत आहे. युवकांनी शारिरीक व मानसिक प्रगती करुन आपल्या क्षेत्रात देशसेवा करावी. स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ. ए. एस. सरतापे यांनी केले. कार्यक्रमास प्राचार्य डॉ. यु. एच. शहा, डॉ. पी. एस. माने, ए. टी. खाडे, डॉ. ए. एस. सरतापे यांच्यासह सर्व विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

BALWANT COLLEGE
LIBRARY
VITA

# Janpravas Date 04-02-2019



दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा सांगली

www.janpravas.in | janpravaslive.tv

## राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन प्रश्नमंजुषा स्पर्धेत 'बळवंत'ला विजेतपद

विटा ◉ प्रतिनिधी

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्याप्रबोधिनीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन प्रश्नमंजुषा स्पर्धेत विटा येथील बळवंत कॉलेजने विजेतपद पटकावले. यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स सातारा येथे स्पर्धा झाली. रयत व इतर शिक्षण संस्थांच्या एकूण ३९ महाविद्यालयांचे संघ या स्पर्धेत सहभागी झाले होते.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांच्या अभ्यासक्रमावर आधारित प्रश्न असे प्रश्नमंजुषा स्पर्धेचे स्वरूप होते अत्यंत चुरशीने ही स्पर्धा झाली. महाविद्यालयात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनाच या स्पर्धेत सहभागी होता येते. महाविद्यालयाचा एकच संघ (दोन विद्यार्थी) सहभागी होऊ शकतो. प्राथमिक, उपांत्य व अंतिम अशा तीन फेऱ्यांमध्ये ही स्पर्धा घेतली जाते.

बळवंत कॉलेजच्या विजेत्या संघात संतोष हणमंत जानकर, प्रतीक संजय म्हेत्रे या बी.ए. भाग-२ मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचा समावेश होता. दोन्ही विद्यार्थी बळवंत कॉलेजच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात एमपीएससीचा अभ्यास करत आहेत. या विद्यार्थ्यांना केंद्र संचालक संतोष पोरे व समन्वयक ज्योतिर्लिंग स्वामी यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले आहे. विजेत्या संघास करंडक, प्रशस्तिपत्र व रोख दहा हजार रुपयांचे पारितोषिक मिळाले.

रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी महोत्सवी वर्षात बळवंत कॉलेजने मिळवलेल्या घवघवीत यशाबद्दल रयतचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, कॉलेजचे महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन आ. डॉ. विश्वजित कदम, विभागीय अध्यक्ष माधवराव मोहिते, प्रभारी प्राचार्य डॉ. उज्ज्वला शहा यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

राज्यस्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचा सत्कार करताना प्रभारी प्राचार्या डॉ. उज्ज्वला शहा, केंद्र संचालक संतोष पोरे व समन्वयक ज्योतिर्लिंग स्वामी व इतर.

BALWANT COLLEGE LIBRARY VITA

सोमवार - दि. ४-२-१९

**Punya Nagari Date 10-01-2019**


# पुण्य नगरी

गुरूवार, १० जानेवारी २०१९ ॥ कोल्हापूर-सांगली ॥ वर्ष :१७ ॥ अंक : १० ॥ पाने १२+४=१६ ॥ किंमत : ५.००


## संशोधनात दीर्घकालीन

विटा/प्रतिनिधी : 'संशोधकांनी स्वतःला विषयाच्या पलीकडे जाऊन आंतरविद्याशाखीय संशोधन करण्यावर भर दिला पाहिजे. अशा संशोधनाने समाजातील विविध प्रश्न सोडविणे शक्य आहे. संशोधकाने स्वतःला अद्ययावत करण्याबरोबरच उन्नत होण्याकडे कल असला पाहिजे. चीन, जपान, जर्मनी या देशांनी संशोधन क्षेत्रासाठी आखलेल्या दीर्घकालीन धोरणाची भारतालाही गरज आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान शाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. पी.एस.पाटील यांनी व्यक्त केले.

रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी महोत्सवानिमित्त येथील बळवंत महाविद्यालयात विज्ञान शाखेद्वारा आयोजित 'ॲडव्हान्सेस इन प्युअर ॲण्ड अप्लाईड सायन्सेस' या विषयावरील आंतरराष्ट्रीय विज्ञान परिषदेचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी टेक्सास (अमेरिका) येथील एम. डी. अंडरसन सेंटरचे प्रसिद्ध संख्याशास्त्रज्ञ प्रा. डॉ. संजय शेटे होते. प्रा. डॉ. शेटे म्हणाले, 'विविध ज्ञानशाखातून विखुरलेली विज्ञान ही एक प्रगत ज्ञानशाखा आहे. जीवसंख्याशास्त्रासारखा एक वेगळा विज्ञान विषय संशोधकांना महत्वाचा ठरु शकतो. जीवसंख्याशास्त्र या विषयामध्ये मानवी तसेच प्राण्यांची गुणसूत्रे अभ्यासणे, कॅन्सर,



विटा : येथील बळवंत महाविद्यालयात सारां

डायबेटीस यासारख्या आजारांना कारणीभूत जनु घेता येतो. आपल्याला स्फूर्तीसाठी अमेरिका कोणत्याही देशाकडे पाहण्याची गरज नाही कार देशातच प्रचंड मोठी विज्ञान गुणवत्ता आहे.

यावेळी सहभागी संशोधकांच्या शोधनिबंध पुस्तिकेचे प्रकाशान प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते कर दोन दिवस चाललेल्या या परिषदेत ३३० संशोधक विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. तर १३०

---

०-४०००, ९२०, भात ०-६५००,

कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती प्रकाश जमदाडे यांनी केले.

बसवराज ब्रि मठाधिपती माडग्याळचे

## दुष्काळाच्या सवलती द्या ; अन्यथा उप

न १ वरुन

व प्रशासनाच्या भूमिकेबाबत स्पष्ट यक्त करत निवेदन दिले. यावेळी वेत प्रथमेश पवार, रोहित चव्हाण, ळ, राजेश गणाचारी, प्रशांत वाघमोडे, राणी, अभिजित शेजूळ, विजय शिंदे, ल आदी उपस्थितत होते. तहसीलदार ल यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले तालुक्यात भीषण दुष्काळ पडलेला दोन महिने झाले केवळ कागदी घोडे जात आहेत. उपाययोजना केल्या जात नाहीत ही शोकांतिका आहे पाण्याचा, जनावरांचा चा असताना उपाययोजना येत्या १३ जनेवारीपर्यंत उ राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत प्रकाश शेंडगे, सुरेश शिं मार्गदर्शनाखाली १४ जाने करण्याचा इशारा दिला आहे हयगय केल्यास येणाऱ्या २० जनता व युवा वर्ग त्यांना इशाराही मदने यांनी दिला

---


## लदारानी ... की

▶▶ पान १ वरुन : दीपक वजाळे, पुरवठा विभा शहाजी जानराव, स्वाती पाटील यांनी सरकारी कर्मचा ओलावा दाखवून दिला. अशाच गरजू व गोरगरीब येथे बसलो आहे, ते आमचे कर्तव्यच होते. अशा चांगल्या माणुसकीच्या कामासाठी आम्ही कायम उद्गार यावेळी तहसीलदार दीपक वजाळे यांनी वेल्हाळ यांच्या चेहऱ्याबरील तणाव पूर्ण संपलेला


BALWANT COLLEGE LIBRARY VITA

BALWANT COLLEGE LIBRARY VITA, (SANGLI)

# Janpravas Date- 16-01-2019



दैनिक
बातम्यांचा राजा
जनप्रवास

दै. जनप्रवास - दि. १६।१।२०१९

## बळवंत कॉलेजमध्ये शुक्रवारी परिसंवादाचे आयोजन

विटा ● प्रतिनिधी

रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी वर्षानिमित्त बळवंत कॉलेजमध्ये मराठी विभाग आणि शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ यांच्यातील सामंजस्य करार उपक्रमांतर्गत भाई संपतराव पवार लिखित 'मी लोकांचा सांगाती' या आत्मकथनात्मक पुस्तकावर शुक्रवारी दि. १८ जानेवारी रोजी सकाळी साडेनऊ वाजता संत गाडगेबाबा सभागृहात परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.


या परिसंवादासाठी प्रमुख वक्ते म्हणून शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रा. डॉ. रणधीर शिंदे तसेच सांगली येथील ॲड. के. डी. शिंदे उपस्थित राहणार आहेत. लोकशक्ती जागृत करुन शाश्वत विकासाचा मार्ग स्थापित करण्यासाठी अविरत धडपडणाऱ्या भाई संपतराव पवार यांच्या पुस्तकावर या परिसंवादात विविधांगानी चर्चा होणार असून सदर परिसंवादासाठी विद्यार्थी, अभ्यासक यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्या डॉ.उज्वला शहा यांनी केले आहे.

BALWANT COLLEGE
LIBRARY
VITA

LIBRARIAN
Balwant College,
VITA.

PRINCIPAL
Balwant College, VITA
Dist. Sangli

**Janpravas Date- 16-01-2019**



दैनिक महासत्ता

दै. महासत्ता - दि. १६।१।२०१९

## विट्याच्या एनसीसी छात्र सैनिकाची दिल्ली परेडसाठी निवड

**विटा, ता.१५ (प्रतिनिधी)–**

येथील बळवंत महाविद्यालयातील एनसीसी छात्र सैनिक महेश मस्के याची प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्ली येथे होणाऱ्या परेडसाठी निवड झाली आहे. सातारा सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातून यावर्षी दिल्ली परेडसाठी निवड झालेला तो एकमेव छात्रसैनिक आहे.

प्रजासत्ताक दिनानिमित्त होणाऱ्या परेड मध्ये गेल्या सहा वर्षात बळवंत महाविद्यालयाने सातत्यपूर्ण सहभाग नोंदवला आहे. यावर्षी महेश मस्केची दिल्ली परेडसाठी निवड झाली आहे. त्याला लेफ्टनंट सर्जेराव चिले, प्रभारी प्राचार्य डॉ. उज्जवला शहा यांचे मार्गदर्शन लाभले.

BALWANT COLLEGE LIBRARY VITA

LIBRARIAN
Balwant College,
VITA.

PRINCIPAL
Balwant College, VITA
Dist. Sangli

# Lokmat Date 28-01-2019

लोकमत सांगली, सोमवार, दि. २८ जानेवारी २०१९ २

## विटा येथील बळवंत महाविद्यालयाचे यश

लोकमत न्यूज नेटवर्क

विटा : रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्याप्रबोधिनीच्यावतीने घेण्यात आलेल्या आंतरमहाविद्यालयीन राज्यस्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत विटा येथील बळवंत महाविद्यालयाच्या संघाने राज्यात प्रथम क्रमांक संपादन करून विजेतेपद पटकाविले. सातारा येथील यशवंतराव चव्हाण सायन्स महाविद्यालयात या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांच्या अभ्यासक्रमांवर आधारित ही प्रश्नमंजुषा स्पर्धा होती. प्राथमिक, उपांत्य व अंतिम अशा तीन फेऱ्यात ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत रयत व इतर शिक्षण संस्थांच्या सुमारे ३९ महाविद्यालयांचे संघ स्पर्धेत सहभागी झाले होते.

बळवंत महाविद्यालयातील बी. ए. भाग-२ मधील संतोष हणमंत जानकर व प्रतीक संजय म्हेत्रे या दोनच विद्यार्थ्यांनी चांगली कामगिरी करत स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला. या विद्यार्थ्यांना करंडक, प्रशस्तीपत्र व रोख दहा हजार रुपये देण्यात आले. यशस्वी विद्यार्थ्यांचे प्र. प्राचार्या डॉ. उज्ज्वला शहा, केंद्र संचालक प्रा. संतोष पोरे, ज्योतिर्लिंग स्वामी यांचे मार्गदर्शन लाभले.

BALWANT COLLEGE LIBRARY VITA

ग्रंथपाल,
बळवंत कॉलेज, विटा
जि सांगली

प्राचार्य
बळवंत कॉलेज, विटा
जि. सांगली

# Punyanagri Date-25-01-2019

पुण्यनगरी

। शुक्रवार, २५ जानेवारी २०१९ । कोल्हापूर - सांगली

smart Sangli

## प्रश्नमंजुषा स्पर्धेत बळवंत कॉलेजला विजेतेपद

### कर्मवीर राज्यस्तरीय स्पर्धा

सांगली / प्रतिनिधी

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्याप्रबोधिनीच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन प्रश्नमंजुषा स्पर्धेत विटा येतील बळवंत कॉलेजने विजेतेपद पटकावले. यशवंतराव चव्हाण इन्स्टियूट्यूट ऑफ सायन्स, सातारा येथे नुकतीच ही स्पर्धा पार पडल्या. 'रयत' व इतर शिक्षण संस्थांच्या एकूण ३९ महाविद्यालयाचे संघ स्पर्धेत सहभागी झाले होते.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांच्या अभ्यासक्रमावर आधारित प्रश्न असे या प्रश्नमंजुषा स्पर्धेचे स्वरूप असून अत्यंत चुरशीने ही स्पर्धा होत असते. महाविद्यालयात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनाच या स्पर्धेत सहभागी होता येते. तसेच प्रत्येक महाविद्यालयाचा एकच संघ (दोन विद्यार्थी) सहभागी होऊ शकतो. प्राथमिक, उपांत्य व अंतिम अशा तीन फेऱ्यामध्ये ही स्पर्धा घेतली जाते.



सांगली : विजेत्या संघास पारितोषिक प्रदान करताना केंद्र संचालक.

बळवंत कॉलेजच्या विजेत्या संघात संतोष हणमंत जानकर व प्रतीक संजय म्हेत्रे या बी. ए. भाग-२ मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचा समावेश होता. हे दोन्ही विद्यार्थी बळवंत कॉलेजच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात एम.पी.एस.सी.चा अभ्यास करत असून केंद्र संचालक प्रा. संतोष पोरे व समन्वयक ज्योतिर्लिंग स्वामी यांनी त्यांना मार्गदर्शन केले. विजेत्या संघास करंडक, प्रशस्तीपत्र व रोख दहा हजार रुपयांचे पारितोषिक मिळाले.

रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी महोत्सवी वर्षात बळवंत कॉलेजने मिळवलेल्या यशाबद्दल 'रयत'चे चेअरमन डॉ. अनिल पाटील, बळवंत कॉलेजच्या महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन आम. डॉ. विश्वजीत कदम, विभागीय अध्यक्ष माधवराव मोहिते, प्र. प्राचार्या डॉ. उज्वला शाह यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

BALWANT COLLEGE LIBRARY VITA

LIBRARIAN

प्राचार्य
बळवंत कॉलेज, विटा

# Lokmat Date- 29-01-2019

लोकमत
www.lokmat.com

# घरी फुलराण्या असतील, तरच घराला घरपण

## श्रीनिवास पाटील : विंटा येथे रयत शिक्षण संस्थेतर्फे 'ती फुलराणी' उपक्रमास प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

विटा : मुलगीसुध्दा वंशाचा दिवा बनू शकते. कारण मुली या मुलांपेक्षा समंजस असतात. त्यामुळे मुलीला फुलराणी म्हटले तरी वावगे ठरणार नाही. प्रत्येक घरी फुलराण्या असतील, तरच घराला घरपण येते, असे प्रतिपादन सिक्कीमचे माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील यांनी केले.

विटा येथील बळवंत महाविद्यालयात रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी महोत्सवानिमित्त 'ती फुलराणी' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत खानापूर तालुक्यात एक किंवा दोन फक्त मुली असलेल्या पालकांचा सत्कार माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील यांच्याहस्ते करण्यात आला.



विटा येथे 'ती फुलराणी' या उपक्रमावेळी श्रीनिवास पाटील यांनी मार्गदर्शन केले.

### जनजागृती होईल!

यावेळी आबासाहेब देशमुख म्हणाले, 'ती फुलराणी' उपक्रम कौतुकास्पद असून संस्थेच्या सर्व शाखांपर्यंत पोहोचविला जाईल. या उपक्रमामुळे स्त्री भ्रूणहत्येपासून परावृत्त होण्यासाठी समाजात जागृती निर्माण होईल, अशी अपेक्षा आहे.

यावेळी रयत शिक्षण संस्थेचे विभागीय अध्यक्ष माधवराव मोहिते, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य आबासाहेब देशमुख, देवदत्त राजोपाध्ये, अशोकराव साळुंखे उपस्थित होते.

यावेळी तालुक्यातील ६० पालकांचा सत्कार करण्यात आला. प्रभारी प्राचार्या डॉ. उज्वला शहा यांनी स्वागत व प्रा. डॉ. डी. एम. सनदी यांनी प्रास्ताविक केले. या कार्यक्रमास डॉ. शहनाज सय्यद, पोपटराव पवार, प्रा. एस. एस. बागवडे, प्रा. संध्या पोतदार, प्रा. वाघुंबरे यांच्यासह विद्यार्थी, पालक व नागरिक उपस्थित होते.


४ | सांगली, मंगळवार, दि. २९ जानेवारी २०१९

BALWANT COLLEGE LIBRARY * VITA *

ग्रंथपाल,
बळवंत कॉलेज, विटा
जि. सांगली

प्राचार्य
बळवंत कॉलेज, विटा
जि. सांगली

# Sakal Date-03-09-2018



www.esakal.com

## 'स्त्री आरोग्य'वर 'बळवंत'मध्ये व्याख्यान

सकाळ वृत्तसेवा

विटा, ता. २ : बळवंत महाविद्यालयात 'स्त्री आरोग्य काळाची गरज' वर डॉ. गणेश पाडळकर यांचे व्याख्यान झाले. महिला कल्याण युवती मंचने आयोजन केले होते. प्राचार्य डॉ. उज्ज्वला शहा अध्यक्षस्थानी होत्या. संकोचामुळे मुलींकडून समस्या उशिरा सांगतात. जनजागृती महत्त्वाची आहे, असे सांगून डॉ. पाडळकर म्हणाले, स्त्रियांत कर्करोगाच्या संदर्भातील समस्या निर्माण होताहेत. रक्त, कॅल्शियमची कमतरता असते. त्याचा स्त्रियांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतो.'' डॉ. श्रेया पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. एस. ए. खोत यांनी आभार मानले. उपप्राचार्य नंदिनी साळुंखे, संध्या पोतदार, डॉ. शहनाज सय्यद, डॉ. सीमा मरजे उपस्थित होते.

3-9-2018

दैनिक सकाळ

BALWANT COLLEGE LIBRARY VITA

# Sakal Date-24-08-2018



## बळवंत महाविद्यालयात मतदार साक्षरता क्लब

विटा, ता. २३ : महाविद्यालयीन विद्यार्थ्यांत मतदान पद्धती समजावून घ्यावी. मतदानात सहभाग वाढवावा, यासाठी निवडणूक आयोगाने वेळोवेळी मतदार जनजागृती करण्याचे काम सुरू केले आहे. यासाठी 'मतदार साक्षरता क्लब'चा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार रंजना उबरहंडे यांनी केले. येथील बळवंत महाविद्यालयात स्थापन केलेल्या 'मतदार साक्षरता क्लब'चा प्रारंभ त्यांच्या हस्ते झाला. त्यावेळी त्या बोलत होत्या. १ सप्टेंबर ते ३१ नोव्हेंबरपर्यंत हा क्लब राबवण्यात येणार आहे, असे तहसीलदार उबरहंडे यांनी सांगितले. यावेळी प्राचार्या उज्वला शहा उपस्थित होते.

दै. सकाळ - २४/८/१८

BALWANT COLLEGE LIBRARY VITA

## Janpravas Date-01-08-2018

# बळवंत कॉलेजमध्ये कागदी पिशव्या बनविण्याची कार्यशाळा संपन्न

**विटा • प्रतिनिधी**

सध्याच्या काळामध्ये प्लास्टिक प्रदुषण हा एक डोकेदुखीचा विषय बनला आहे. प्लास्टिकमुळे पर्यावरणावर घातक परिणाम होत आहेत. पर्यावरणाच्या ऱ्हास काळात पर्यावरण वाचवण्यासाठी प्रत्येक भारतीय नागरिकाने प्रयत्न केले पाहिजेत. वृक्षारोपण करणे. प्लास्टिकचा वापर न करणे या माध्यमातून आपण प्रदूषणमुक्त पर्यावरण निर्माण करू शकतो. त्याचाच एक भाग म्हणून आम्ही विद्यार्थ्यांसाठी कागदी पिशव्या बनवण्याची कार्यशाळा घेतली आहे, असे प्रतिपादन बळवंत कॉलेजचे इंग्रजी विभागप्रमुख प्रा. डॉ. डी. एस. सनदी यांनी केले. येथील बळवंत कॉलेजमध्ये इंग्रजी विभागामार्फत एक स्तुत्य उपक्रम म्हणून आयोजित केलेल्या कागदी पिशव्या बनविण्याच्या प्रशिक्षण कार्यशाळेप्रसंगी ते बोलत होते.

डॉ. डी. एम. सनदी म्हणाले, शासनाने प्लास्टिक बंदीचा निर्णय घेतला आहे. प्लास्टिक पिशव्यांना पर्याय म्हणून कागदी, कापडी पिशव्या वापरण्यासंदर्भात सर्वत्र जनजागृती होताना दिसत आहे. या पर्यावरण जनजागृतीचा एक भाग म्हणून रयत शिक्षण संस्थेच्या येथील बळवंत कॉलेजमध्ये इंग्रजी विभागामार्फत एक स्तुत्य उपक्रम कागदी पिशव्या बनविण्याची प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना कागदी पिशव्या तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या कागदी पिशव्या तहसिलदार, प्रांताधिकारी, मुख्याधिकारी, पोलीसप्रमुख, न्यायाधीश तसेच महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी यांना देण्यात येणार आहेत. यावेळी प्राचार्य डॉ.उज्वला शहा, प्रा.संध्या पोतदार, प्रा.प्रिया भस्मे, प्रा.माधुरी पाटील यांच्यासह सर्व विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.



विट्यात बळवंत कॉलेजमध्ये आयोजित केलेल्या कागदी पिशव्या बनविण्याची प्रशिक्षण कार्यशाळेप्रसंगी सर्व विद्यार्थी व प्राध्यापक.

दै. जनप्रवास - दि. १/८/२०१८

BALWANT COLLEGE LIBRARY VITA

## Janpravas 13-08-2018

# 'स्व' विकास हीच यशाची गुरुकिल्ली : कालिदास पाटील



विटा येथील बळवंत कॉलेजमध्ये आयोजित केलेल्या 'समुपदेशनाची गरज' या विषयावरील व्याख्यानात बोलताना कालिदास पाटील.

## 'बळवंत'मध्ये 'समुपदेशनाची गरज' वर व्याख्यान

**विटा • प्रतिनिधी**

सध्याच्या धावपळीच्या काळात माणूस मनस्वास्थ हरवत चालला आहे. मानवी वेदना, विकार वाढत आहे. त्यामुळे मानवी जीवनातील दुःख वाढत चालले आहे. मानसिक स्वास्थ टिकविण्यासाठी माणसाला समुपदेशनाची गरज असते. मात्र स्वतःचे समुपदेशक होऊन आपल्यात सकारात्मक बदल घडवून आणणे महत्वाचे आहे. "स्व" विकास हीच यशाची गुरुकिल्ली असल्याचे प्रतिपादन इस्लामपूर येथील शुश्रूषा सल्ला मार्गदर्शन व प्रशिक्षण संस्थेचे प्रमुख कालिदास पाटील यांनी केले.

येथील बळवंत कॉलेजमध्ये मानसशास्त्र विभाग व समुपदेशन केंद्राच्या वतीने आयोजित केलेल्या "समुपदेशनाची गरज" या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. उज्ज्वला शहा होत्या.

कालिदास पाटील पुढे म्हणाले की, शिकलेली माणसं सरळ मार्गाने जीवन जगतीलच असे नाही. त्यासाठी मन आणि मनाचे आरोग्य निरोगी असेल पाहिले.

मनाच्या निरोगीपणासाठी सकारात्मक विचार महत्वाचे ठरतात. ते प्रत्येकाने आत्मसात करणे महत्वाचे आहे.

प्राचार्या डॉ. उज्ज्वला शहा म्हणाल्या, "व्यक्तिमहत्व विकास" ही आजच्या काळातील महत्वाची संकल्पना आहे.

प्रत्येक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आपल्या व्यक्तिमहत्व विकास साध्य करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन सुशांत देवकर यांनी केले. यावेळी कला विभागाचे उपप्राचार्य डॉ. आर. आर. घार्गे, ज्युनिअर विभागाच्या उपप्राचार्या प्रा. एन. एस. साळुंखे, डॉ. शिवाजी पाटील यांच्यासह विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते. आभार प्रा. डी. ए. पाटील यांनी मानले.

दै. जनप्रवास -१३/८/१८

धगणक्षेत्रात | आडवे शब्द

दै. जनप्रवास -
दि. -१३/८/२०१८

BALWANT COLLEGE LIBRARY VITA

# Janpravas 13-08-2018

## राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन प्रश्नमंजुषा स्पर्धेत 'बळवंत'ला विजेतपद

विटा ● प्रतिनिधी

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्याप्रबोधिनीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन प्रश्नमंजुषा स्पर्धेत विटा येथील बळवंत कॉलेजने विजेतपद पटकावले. यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स सातारा येथे स्पर्धा झाली. रयत व इतर शिक्षण संस्थांच्या एकूण ३९ महाविद्यालयांचे संघ या स्पर्धेत सहभागी झाले होते.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांच्या अभ्यासक्रमावर आधारित प्रश्न असे प्रश्नमंजुषा स्पर्धेचे स्वरूप होते अत्यंत चुरशीने ही स्पर्धा झाली. महाविद्यालयात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनाच या स्पर्धेत सहभागी होता येते. महाविद्यालयाचा एकच संघ (दोन विद्यार्थी) सहभागी होऊ शकतो. प्राथमिक, उपांत्य व अंतिम अशा तीन फेऱ्यांमध्ये ही स्पर्धा घेतली जाते.

बळवंत कॉलेजच्या विजेत्या संघात संतोष हणमंत जानकर, प्रतीक संजय म्हेत्रे या बी.ए. भाग-२ मध्ये शिक्षण घेत असलेल्यां विद्यार्थ्यांचा समावेश होता. दोन्ही विद्यार्थी बळवंत कॉलेजच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात एमपीएससीचा अभ्यास करत आहेत. या विद्यार्थ्यांना केंद्र संचालक संतोष पोरे व समन्वयक ज्योतिर्लिंग स्वामी यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले आहे. विजेत्या संघास करंडक, प्रशस्तिपत्र व रोख दहा हजार रुपयांचे पारितोषिक मिळाले.




राज्यस्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचा सत्कार करताना प्रभारी प्राचार्या डॉ. उज्वला शहा, केंद्र संचालक संतोष पोरे व समन्वयक ज्योतिर्लिंग स्वामी व इतर.

रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी महोत्सवी वर्षात बळवंत कॉलेजने मिळवलेल्या घवघवीत यशाबद्दल रयतचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, कॉलेजचे महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन आ. डॉ. विश्वजित कदम, विभागीय अध्यक्ष माधवराव मोहिते, प्रभारी प्राचार्य डॉ. उज्वला शहा यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

LIBRARIAN
Balwant Colle
VITA.

## Sakal Date-22-06-2018



2018-19

### बळवंत महाविद्यालय नियतकालिक स्पर्धेत प्रथम

विटा, ता. २१ : राज्यस्तरीय महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेत बळवंत महाविद्यालयाला प्रथम क्रमांक मिळाला. झी मराठीतर्फे (मुंबई) दिशा उपक्रमांतर्गत या स्पर्धा झाल्या. महाविद्यालयाचा गौरव करण्यात आला.

तसेच उत्तम साहित्यकृतीसाठी विशाल जाधव, कोमल चव्हाण, किरण कांबळे यांना प्रत्येकी दहा हजार रुपयांची पारितोषिके देण्यात आली. विद्यार्थ्यांना प्रभारी प्राचार्य डॉ. उज्ज्वला शहा, डॉ. शिवाजी पाटील, प्रा. सुनील बुद्धनावर, डॉ. शहनाज सय्यद, प्रा. सुनील बागवडे, डॉ. श्रेया पाटील यांनी मार्गदर्शन केले.

BALWANT COLLEGE
LIBRARY
VITA

दैनिक सकाळ
22/6/2018